अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत व स्फुर्तीस्थान श्रीमंत
छत्रपती शिवाजी महाराजांना त्रिवार मानाचा मुजरा..

www. sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे




• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १०९ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.१९ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


## राज्याचा अर्थसंकल्प १० मार्चला सादर होणार

# शेतकऱ्यांची कर्जमाफी ते लाडकी बहीण योजना ;कोणत्या मोठ्या घोषणा होणार ?

**मुंबई (वृत्तसंस्था)**
राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून सुरु होणार आहे. ३ मार्च ते २१ मार्च या कालावधीत हे अधिवेशन पार पडणार आहे. तसेच १० मार्च रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर करणार आहेत. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु होईल. दरम्यान, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यपालांचं अभिभाषण होईल. त्यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणावर दोन दिवस चर्चा होणार आहे. तसेच त्यानंतर पुरवणी मागण्या मांडल्या जाणार आहेत.केंद्र सरकारचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आता महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर होणार असल्यामुळे संपूर्ण राज्याचं लक्ष याकडे लागलं आहे. या अर्थसंकल्पात मोठ्या घोषणा होण्याची शक्यता आहे.
विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचं सरकार सत्तेत आलं.त्यामुळे या अर्थसंकल्पामधून सर्वसामान्य जनतेला काही दिलासा मिळणाऱ्या घोषणा होतात का? याकडे अनेकांचं लक्ष लागलं आहे.





### लाडक्या बहिणींचा हप्ता वाढणार ?

विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना दर महिन्याला १५०० रुपये त्यांच्या खात्यावर देण्यात येतात. मात्र, लाडकी बहीण योजनेच्या १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्यात येणार असल्याची घोषणा महायुतीच्या नेत्यांनी केली होती. मात्र, अद्याप या घोषणेची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे आता अर्थसंकल्पीय अधिवेशनात लाडकी बहीण योजनेबाबत काही घोषणा करण्यात येणार का? याकडे लाडक्या बहिणींचं लक्ष लागलं आहे.

## बदलापुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे भव्य अनावरण



**बदलापूर । प्रतिनिधी**
छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर असलेल्या बदलापुरात शिवरायांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्याचे अनावरण उत्साहात पार पडले. या वेळी शेकडो शिवप्रेमी, भगव्या पताका, ढोल-ताशांच्या गजरात, लेझीम पथकाच्या तालावर आणि शिवकालीन वेशभूषेतील कलाकारांच्या साक्षीने अनावरण सोहळा संपन्न झाला. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला.
पुतळा अनावरणाच्या वेळी लाडक्या भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवप्रतिमेला मानवंदना दिली. संपूर्ण परिसर भगवामय झाला होता. मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वागत बदलापूरच्या बहिणींकडून विशेष सन्मानाने करण्यात आले. अनावरणानंतर शाळेच्या मैदानात फडणवीस यांची विशेष सभा आयोजित करण्यात आली, जिथे शिवप्रेमी, भाजपा कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.
या भव्य पुतळ्याच्या स्थापनेसाठी स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी विशेष पुढाकार घेतला होता. पुतळ्यासाठी मंजुरी विधानसभा निवडणुकीपूर्वी मिळाली होती, मात्र निर्मितीसाठी लागणाऱ्या वेळेमुळे विधानसभेनंतर त्याचे काम पूर्ण झाले. सोमवारी हा पुतळा पुण्यातील कार्यशाळेतून बदलापूरकडे निघाला आणि अनेक अडचणींवर मात करत बुधवारी शहरात मोठ्या मिरवणुकीनंतर दाखल झाला.
बदलापूरचा शिवाजी महाराजांशी ऐतिहासिक संबंध असून, लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या शिवजयंती आणि गणेशोत्सवाला येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असे. १९२० पासून येथे शिवजयंती आणि सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. इतकेच नव्हे, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील येथे शिवजयंतीसाठी उपस्थिती लावल्याचा उल्लेख इतिहासात आहे. त्यामुळे बदलापूरच्या प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याचे स्वप्न अखेर साकार झाले.

## पक्षाची विचारधारा तळागळा पर्यंत पोहोचवा विधिमंडळ पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार

### चंद्रपूर येथे सत्कार समारंभ व कार्यकर्ता बैठक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
धर्मांधतेतून अराजकता पसरविणे व खोटी आश्वासने देऊन सत्ता काबीज करणे हाच विरोधकांचा डाव असून अशा गंभीर परिस्थितीतून जर पक्षाला नवी उभारी द्यायची असेल तर पक्षाची विचारधारा घरोघरी पोहोचवा. असे आवाहन काँग्रेसचे नवनियुक्त विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी केले. ते चंद्रपूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित सत्कार समारंभ व कार्यकर्ता बैठकीत सत्कार मूर्ती म्हणून बोलत होते.
आयोजित सत्कार समारंभ व बैठकीस प्रामुख्याने चंद्रपूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष रामू तिवारी, माजी महिला जिल्हाध्यक्ष सुनीता लोढीया, धोबे, माजी नगरसेवक नंदू नागरकर, प्रवीण



पडवेकर, माजी सभापती दिनेश चोखारे, घुगु शहर काँग्रेस अध्यक्ष राजू रेड्डी, सय्यद रमजान अली मंचावर उपस्थित होते. यावेळी काँग्रेस नेते, राज्याचे माजी विरोधी पक्षनेते त्याचा ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाल्याबद्दल शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कार्यकर्त्यांना मार्गदर्शनपर बोलताना विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार म्हणाले की, सत्ताधारी विरोधक सत्ता काबीज करण्यासाठी मोठे अर्थकारण, खोटी आश्वासने, प्रलोभने असा कुठलाही स्तर गाठत असून निवडणुकी मध्ये विजयश्री मिळविण्यासाठी वाटेल ते करीत आहे. अशा विरोधकांना समर्थपणे तोंड देण्यासाठी पक्षातील आपसी गटबाजी विसरून प्रत्येक कार्यकर्त्यांनी मी व माझा पक्ष असे ध्येय अंगीकारू पक्षाची धर्मनिरपेक्ष विचारधारा तळागळापर्यंत पोहोचवावी. यासाठी अथक परिश्रम घेणे काळाची गरज आहे. आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुका लक्षात घेता आपण सर्वांनी जोमाने कामाला लागावे असेही ते यावेळी म्हणाले. तर मागील निवडणुकांमधील चुकांची पुनरावृत्ती होऊ नये याची अधिकाधिक काळजी घेऊन प्रत्येक कार्यकर्त्यांनी पक्ष संघटनेवर जोर देऊन कार्य केल्यास आगामी निवडणुकांमध्ये आपण विरोधकांशी यशस्वीरित्या लढू असे आव्हाने त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तिवारी यांनी केले यावेळी काँग्रेस पक्षाचे बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.


## हर्षवर्धन सपकाळ यांनी स्वीकारली काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदाची सूत्रे

**मुंबई (वृत्तसंस्था):** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे नवीन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज टिळक भवन इथे चार्ज घेतला. या प्रसंगी राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला, ज्येष्ठ नेते मुकुल वासनिक, मावळते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधी मंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे उपस्थित होते.
काँग्रेसमधील अनेक मोठ्या नेत्यांची नावे चर्चेत असताना पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांना प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांचे नाव समोर आल्यानंतर अनेकांचे डोळे मोठे झाले होते. इतकेच नाही तर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी देखील याबाबत आश्चर्य व्यक्त केल्याचे पाहायला मिळाले. त्यांच्या निवडीमुळे पक्षातील काही वरीष्ठ नेते नाराज असल्याचे देखील सांगितले जात आहे. त्यामुळे आजच्या समारंभाला अनेक मोठ्या नेत्यांनी दांडी मारली.तर मला वैयक्तिक काम असल्यामुळे मी समारंभाला उपस्थित नसल्याचे काँग्रेसचे नेते नितीन राऊत यांनी म्हटले आहे.














## मोकाट श्वानांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी चंद्रपूरमध्ये विशेष मोहीम

**चंद्रपूर**–शहरात आठ ते नऊ हजार बेवारस श्वान आहेत. या मोकाट, बेवारस, भटके श्वान यांची संख्या नियंत्रित ठेवणे, रेबीज निर्मुलन व मनुष्य - प्राणी संघर्ष टाळणे या दृष्टीने चंद्रपूर महापालिकेद्वारे श्वान लसीकरण व निर्बीजीकरणाची मोहीम सुरु आहे. याअंतर्गत ४०२० मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण (नसबंदी) तज्ञ डॉक्टरांद्वारे करण्यात आले आहे. मोकाट, भटके श्वान ही अनेक ठिकाणची गंभीर समस्या आहे. गाडीच्या मागे धावणे,चावा घेणे,रात्रीच्या वेळेस अंगावर धाऊन जाणे त्यामुळे अपघात होणे इत्यादी प्रकारचे त्रास या बेवारस श्वानांमुळे होतात. श्वानांच्या चाव्यामुळं,अनेकांना प्राण गमवावे लागतात किंवा रेबिजपासून वाचण्यासाठी अनेक इंजेक्शन टोचून घ्यावे लागतात. प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६० व निमल बर्थ कंट्रोल २००१ नुसार श्वानांना मारण्यास बंदी आहे. मात्र मोकाट, भटके श्वान यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच जाते. यावर नियंत्रण आणण्यासाठी चंद्रपूर महापालिकेव्दारे सदर मोहीम राबविली जात आहे.

## छत्रपती महोत्सवचे उदघाट्न छत्रपती मॅरेथॉन ने संपन्न

# मोठया संख्येने स्पर्धक सहभागी; मुम्मका सुदर्शन पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांनी रॅलीला दाखवल हिरवी झेंडी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

छत्रपती महोत्सव २०२५ चे उदघाट्न आज गांधी चौक चंद्रपूर छत्रपती मॅरेथॉन ने संपन्न झाले. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी मॅरेथॉन ला हिरवी झेंडी दाखवून उदघाट्न केले यावेळी आयोजन समितीचे अध्यक्ष आमदार सुधाकर अडबाले यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. स्पर्धेमध्ये जिल्हाभरातील स्पर्धकानी मोठया संख्येने सहभाग घेतला सर्वं स्पर्धका मध्ये चैतन्यपूर्ण उत्साह होता शिवरायाच्या घोषणाने वातावरण दुमदुमले होते पारितोषिक विजेते गट १ पुरुष वय ८ ते १४वर्ष प्रथम रोशन ठाकरे, द्वितीय कृष्णा पारखी, तृतीय ,कुशल कामडे गट २ पुरुष खुला प्रथम भूषण आस्वले द्वितीय रितिक धोडरे तृतीय, पियुष गायधनी गट १ महिला वय ८ ते १४ वर्ष प्रथम सखी दोरखंडे द्वितीय श्रेया येवले

तृतीय तेजस्वी ठाकरे गट २ महिला खुला प्रथम रुचिका नागरकर द्वितीय साक्षी पेलेजवार



तृतीय लावण्या नागरकर यांनी क्रमांक प्राप्त केले तर लक्ष्मी पुंगाटी हिने प्रोत्साहन पर पारितोषिक प्राप्त केले सर्व विजेते व सहभागी यांनी २० फेब्रुवारी ला भव्य कार्यक्रमात बक्षीस दिले जाणार आहे. यावेळी छत्रपती महोत्सव आयोजन समितीचे निमंत्रक संतोष कुचनकर कार्याध्यक्ष प्रा दिलीप चौधरी,सचिव हरीश ससनकर, उपाध्यक्ष राजीव कक्कड, सहसचिव बंडू धोत्रे, सोहेल शेख, कोषाध्यक्ष प्रा निलेश बेलखेडे सहकोषाध्यक्ष प्रा वैशाली तुमराम प्रसिद्धी प्रमुख विजय मुसळे मार्गदर्शक प्राचार्य सूर्यकांत खणके, नंदुभाऊ नागरकर, विजयराव टोंगे कार्यकारी सदस्य चंद्रकांत वैद्य, राजेंद्र खांडेकर, दिलीप रिंगणे, निमेश मानकर, दीपकभाऊ जेऊरकर, निशिकांत देशमुख, दिलीप होरे, विनोद थेरे, प्रा कमलकार धानोरकर, पायल अन्नदेलवार हे उपस्थित होते. संचालन हरीश ससनकर यांनी प्रास्ताविक दीपक जेऊरकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.निलेश बेलखेडे यांनी केले. मॅरेथॉन स्पर्धेच्या आयोजनासाठी विजय बोरकर, जितेंद्र पिंपलशेंडे, मुकेश तेलतुंबडे, गोविंद पवार, आदर्श सर, नावेद व कृष्णा, रोशन बुजाडे यांनी सहकार्य केले.

### आज १९ फेब्रुवारीला शिवजन्मोत्सव पालखी मिरवणूक,

**सायंकाळी ४ वाजता मार्ग गांधी चौक, जटपुरा गेट गांधी चौक या मार्गाने निघणार आहे. पालखी मिरवणूकमध्ये ढोल पथक लेझीम पथक व तसेच मिरवणुकीचे आकर्षण म्हणजे शिवाजी महाराजांच्या काळातील प्रसंगावर आधारित १० देखावे राहील,मिरवनूक मध्ये सहभागी होणाऱ्या सर्व शिवप्रेमी साठी ड्रेस भगवा कुर्ता व पांढरा पायजामा, महिलांसाठी भगवी साडी अथवा ड्रेस यासह इच्छुकांना फेटे घालून देण्याची व्यवस्था राहणार आहे सायंकाळी ८ वाजता जाहीर व्याख्यान छत्रपती शिवाजी महाराज व आजची लोकशाही या विषयावर राजदादा घुमनर यांचे राहणार आहे.**

# शहाबाई भोज यांचे दु:खद निधन;बोरगावमध्ये शोककळा

**करमाळा । प्रतिनिधी**



करमाळा तालुक्यातील बोरगाव येथील माजी सरपंच किसन भोज यांच्या अर्धांगिनी शहाबाई किसन भोज (वय ७५) यांचे *१७ फेब्रुवारी २०२५, शनिवार* रोजी राहत्या घरी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. परिसरात त्या नानी या नावाने परिचित होत्या. संगमेश्वर विद्यालय संगोबा येथील सेवक पिंटू भोज यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दुपारी बोरगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि आप्तेष्टांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली.

# गजानन जुमडे यांचं निधन

**शंकरपूर । प्रतिनिधी**

शंकरपूर येथील रहिवासी व व्यापारी गजानन रामभाऊ जुमडे (वय ६०) यांचं सोमवारी सायंकाळी निधन झालं. मंगळवारी दुपारी शंकरपूर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलं, सुना व नातवंड असा परिवार आहे.



## जंगल वणव्यांचे गांभीर्य पिंपळनेर वन विभाग घेणार केव्हा?

# वनपाल व वनरक्षकांच्या दुर्लक्षामुळे लाखो रुपयांची वनसंपत्ती आगीत भस्मसात!

**धुळे । प्रतिनिधी**

पिंपळनेर वनपरिक्षेत्रातील नदंर्खी कंपार्टमेंट ७८ मधील कुडूपाडा-नवागावजवळील जंगल चार दिवसांपासून आगीच्या तांडवात होरपळत आहे. कोट्यवधी रुपयांची वनसंपत्ती जळून खाक झाली असली तरी वन विभाग मात्र बेफिकीर आहे. शनिवारी लागलेली आग मंगळवारपर्यंत पेटलेली होती, तरीही वनपाल आणि वनरक्षक घटनास्थळी फिरकलेसुद्धा नाहीत. विशेष म्हणजे, प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी भगवान गीते यांच्या कार्यालयात विचारणा केली असता, लेखी स्वरूपात कोणतीही आकडेवारी उपलब्ध नाही, असे



उडवाउडवीचे उत्तर देण्यात आले. स्थानिक गावकऱ्यांनी अथक प्रयत्न करून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला, पण वन विभागाच्या निष्क्रीयतेमुळे जंगलातील अमूल्य वृक्षसंपदा, जैवविविधता आणि प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. वणवा टाळण्यासाठी कोणत्याही ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याने पिंपळनेर वन विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.मानवी हलगर्जीपणामुळे जंगलांना आगी लागत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. वनविभागाने आगीची कारणे शोधून उपाययोजना राबविणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात वृक्षलागवड आणि इतर कामांमध्ये अडकलेल्या वन यंत्रणेने आगलाव्यांचा शोध घेणे जवळपास बंद केले आहे. शासनाचा भरगच्च पगार घेणारे अधिकारी आणि कर्मचारी इतके सुस्त का? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

वनहद्दीत आग लागू शकणारी ज्वालाग्राही साधने बाळगणे गुन्हा आहे. तरीही, बहुतांश घटनांमध्ये आगी नैसर्गिकरीत्या लागण्याऐवजी कुणीतरी जाणूनबुजून लावल्याची शक्यता असते. मात्र, वन विभाग अशा प्रकरणांचा तपास करण्यास कुचराई करत असल्याने कुणावरही गुन्हे नोंद होत नाहीत. परिणामी, जंगल जळतच राहते आणि जबाबदार अधिकारी दुर्लक्ष करतच राहतात.

# फेरीलँड शाळेत सुरक्षित व सुरक्षित स्पर्श याबद्दल बद्दल मार्गदर्शन

## रोटरी क्लबचा रोटरी सप्ताह

**भद्रावती । प्रतिनिधी**

भद्रावती रोटरी क्लबतर्फे १६ ते २३ फेब्रुवारी या दरम्यान रोटरी सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या अंतर्गत रोटरी क्लबतर्फे तालुक्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सप्ताहाचे औचित्य साधून रोटरी क्लबतर्फे शहरातील फेरीलँड स्कूल अँड कॉलेज येथे विद्यार्थिनीकरिता सुरक्षित व असुरक्षित स्पर्श याबद्दल जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, डॉ माला प्रेमचंद,रोटरीचे अध्यक्ष किशोर खंडाळकर, सुनील पोटदुखे, विक्रांत बिसेन, सुनिता खंडाळकर, प्राचार्या वर्षा धानोरकर, कीर्ती




गोहणे, रश्मी बिसेन, रुकसाना शेख, स्वाती चारी, तृप्ती हिरादेवे, कविता सुपे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमातून मार्गदर्शकांनी विद्यार्थिनींना सुरक्षित व असुरक्षित स्पर्श, मासिक पाळी, स्त्रियांचे मानसिक स्वास्थ्य व स्त्रियांच्या अन्य समस्यांबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शाळा तथा महाविद्यालयातील विद्यार्थिनी,शिक्षकवृंद, व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील तमाम शिवभक्तांचे आराध्य दैवत सोमेश्वर देवस्थानचे येत्या २१ तारखेला कलशारोहण सोहळा

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पाच पांडवकालीन स्थापित पिंपरी दुमाला येथील सोमेश्वर देवस्थानचे कलशारोहण सोहळा आयोजित केला आहे. या सोहळ्यानिमित्त शुक्रवार, दिनांक २१ फेब्रुवारी रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या सर्व कार्यक्रमास गावातील सर्व माहेरवासीन, कुटुंबीय, मित्रपरिवार व सर्व भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व सोमेश्वर महाराजांचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट व पिंपरी दुमाला ग्रामस्थांनी केले आहे.

या कलशारोहण सोहळ्यासाठी कलश सौजन्य श्री. बबनराव तु. कुटे (मा. अध्यक्ष, महागणपती देवस्थान ट्रस्ट) व श्री. प्रकाश शेठ मो. लांडे (मा. चेअरमन, रांजणगाव गणपती) तसेच पिंपरी दुमालातील माहेरवासी यांचे सहकार्य लाभले आहे. कलशारोहण सोहळ्यानिमित्त दिनांक २१ रोजी पहाटे ४.३० वाजता पूजा, मातृका पूजन, होम-हवन



इत्यादी ९.३० वाजेपर्यंत विधी संपन्न होणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता तमाम शिवभक्त व सर्व ग्रामस्थ पाहुणेमंडळी यांच्या उपस्थितीत भव्य कलश मिरवणूक सोहळा संपन्न होणार आहे. यानंतर प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होणार असून हा सोहळा दुपारी १२ वाजेपर्यंत पार पडेल. यानंतर सर्व शिवभक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत मान्यवर देणगीदारांचा सन्मान सोहळा देखील होणार आहे. श्री क्षेत्र सोमेश्वर देवस्थान मंदिरासाठी फुलांचे आकर्षक सजावट करण्याचे सौजन्य ह.भ.प. नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर यांचे लाभले आहे. या कलशारोहण सोहळ्यासाठी ह.भ.प. नंदकिशोर दादा महाराज (आळंदी) उपस्थित राहणार असून महाराजांच्या हस्ते कलशारोहण विधी पार पडणार आहे. तसेच प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. संतोष महाराज कौठाळे यांचे कीर्तन सेवा लाभणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पावन सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांनी केले आहे.

# साहित्य समाजाला प्रेरणा देत समरसतेचा संदेश-अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली

**सोलापूर । प्रतिनिधी**

साहित्य हे समाजाला जगण्याची व जागवण्याची प्रेरणा देत असून, समाजात समरसता निर्माण करण्यासाठी समरसता साहित्य परिषदेचे कार्य कौतुकास्पद आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक आणि पद्मश्री पुरस्कार जाहीर झालेले मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांनी व्यक्त केले.

समरसता साहित्य परिषद, सोलापूरच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांना समरसता साहित्य परिषदेच्या मानचिन्हासह फोटो फ्रेम आणि मानाचा फेटा प्रदान करण्यात आला.सत्काराला उत्तर देताना चित्तमपल्ली म्हणाले, निसर्ग हा आपला खरा मित्र आहे. निसर्गाच्या सानिध्यात राहून प्राणीमात्रांच्या



जीवनसाखळीचे संरक्षण करणे हेच खरे मानवकल्याण आहे. समरसता साहित्य परिषदेने समाजात जागृती निर्माण करून निसर्ग संवर्धन आणि निकोप समाज निर्मितीसाठी उत्कृष्ट साहित्याची निर्मिती करावी. पद्मश्री हा सन्मान माझ्या निसर्ग आणि मानवतेसाठी केलेल्या सेवेसाठीची पोचपावती आहे, असे त्यांनी नमूद केले.

या सोहळ्यात मार्गदर्शक सल्लागार प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार, प्रा. धन्यकुमार बिराजदार, सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रा. माधव कुलकर्णी, महिला आयाम प्रमुख वसुंधरा शर्मा-कुलकर्णी, कार्यवाह कविवर्य देवेंद्र औटी, युवती आयाम सहप्रमुख श्रद्धा रोडगे, प्रसिद्ध गायक झी कन्नड सारेगमप लिटल चॅम्प्स फायनलिस्ट रेवणसिद्ध फुलारी, प्रसिद्धी प्रमुख शरणप्पा फुलारी, काशिनाथ बिराजदार, पश्चिम महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष जगन्नाथ हुक्केरी, सहकार्यवाह दिनेश मडके, अनिता कुलकर्णी, शुभांगी पुजारी, अर्णव कुलकर्णी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार, प्रा. धन्यकुमार बिराजदार, प्रा. माधव कुलकर्णी आणि देवेंद्र औटी यांनी आपल्या मनोगतात चित्तमपल्ली यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव केला. यावेळी दशरथ वडतीले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. तर रेवणसिद्ध फुलारी आणि श्रद्धा रोडगे यांनी अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्यावर रचलेल्या गीतांचे सादरीकरण केले.चित्तमपल्ली यांनी समरसता साहित्य परिषदेच्या कार्याला पाठिंबा देण्याचे अभिवचन देत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पारनेर येथे 'स्वराज्य सप्ताह' चे आयोजन

**पारनेर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने १९ ते २७ फेब्रुवारी दरम्यान 'स्वराज्य सप्ताह' चे आयोजन करण्यात आले आहे. 'राज्य रयतेचे - जिजाऊंच्या शिवबाचे' या टॅगलाईन अंतर्गत हा सप्ताह साजरा होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त पक्षाच्यावतीने हा विशेष उपक्रम राबविण्यात येणार असून, महाराष्ट्राची अस्मिता आणि स्वाभिमान यांच्याशी पक्ष जोडलेला आहे हे जनतेसमोर मांडण्याचा उद्देश आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या रयतेच्या राज्याच्या संकल्पना लोकांसमोर मांडणे आणि राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस हेच तत्व आत्मसात करून शासन चालवते, हे या उपक्रमाच्या माध्यमातून सांगण्यात येणार आहे.या निमित्ताने पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.१० वाजता 'शिवजयंती सोहळा' तसेच 'स्वराज्य सप्ताह' चा शुभारंभ होणार आहे. या कार्यक्रमाला पारनेर नगर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते प्रमुख उपस्थित राहणार आहेत.या




सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने आमदार काशिनाथ दाते सर यांचे संपर्क कार्यालय, पारनेर येथे उपस्थित राहावे, असे आवाहन तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, महिला तालुकाध्यक्ष सुषमा रावडे, युवक तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, युवती तालुकाध्यक्ष अपर्णा खामकर आणि पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

# आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण नागरिकांना आवश्यक-विवेक नायडू

## एक दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**देवळी । प्रतिनिधी**

'प्रगत राष्ट्रात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाला आवश्यक केलेले आहे. कोणतीही आपत्ती सांगून येत नाही म्हणून येणाऱ्या आपत्ती करिता आपण सज्ज असले पाहिजे आणि याकरिताच प्रशिक्षण आवश्यक असते. लहान-सहान आपत्य व्यवस्थापनाकरिता संरक्षण दल किंवा पोलीस दल यांच्यावर अवलंबून न राहता नागरिकांना आपत्तीला तोंड देण्याकरिता सज्ज असले पाहिजे. म्हणूनच आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाला आवश्यक आहे असे प्रतिपादन स्थानिक एस एस एन जे महाविद्यालयातील एनसीसी मैदानावर आयोजित एक दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेला मार्गदर्शन करताना 'यशदा' पुणे चे मास्टर ट्रेनर विवेक नायडू यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना १७ फेब्रुवारी रोजी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शुभम घोरपडे तर प्रमुख अतिथी म्हणून यशदा पुण्याचे मास्टर ट्रेनर विवेक नायडू, मास्टर ट्रेनर लखन गायकवाड, प्रहार समाज जागृती संस्थेचे सचिव संतोष तुरक, वसुंधरा वडतकर, राजश्री भारती, गणेश शेंडे व त्यांचे अधिकारी तथा प्रहार समाज जागृती संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन मोहन गुजरकर उपस्थित होते.

सदर एक दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत स्थानिक एस एस एन जे महाविद्यालय, यशवंत कन्या विद्यालय व वर्धा येथील बजाज कृषी महाविद्यालय येथील ९६ तरुण-तरुणींनी भाग घेऊन प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले.

सदर प्रशिक्षणाचा मुख्य हेतू म्हणजे येत्या महाशिवरात्री यात्रेत गर्दी नियंत्रण, प्रथमोपचार, आग लागण्यापासून जंगलाची सुरक्षा, पर्यावरण संवर्धन व यात्रेकरूंमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वयंसेवकांना योग्य प्रशिक्षण देणे, हा होता. या अंतर्गत प्रथमोपचार, गर्दी नियंत्रणाबाबत योग्य मार्गदर्शन व लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याकरिता घ्यायची काळजी या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कॅप्टन मोहन गुजरकर यांनी आपत्ती व्यवस्थापन महाविद्यालयीन तरुण-तरुणींना आवश्यक करण्यात यावे यावर जोर दिला तर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शुभम घोरपडे यांनी येत्या सत्रात सर्व महाविद्यालयातील इच्छुक तरुण-तरुणींना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देण्याचा जिल्हाधिकारी कार्यालयाचा मानस आहे, असे आपल्या अध्यक्ष भाषणात व्यक्त केले. यावेळी अंडर ऑफिसर आदर्श नाईक सार्जंट मनोज नेहारे, हरिओम उईके, अभिषेक नेहारे, वेदांत कन्नाके, सुजल पराते, आदित्य तामगाडगे, अंडर ऑफिसर श्रद्धा मडावी, मनीषा मडकाम, रसिका बानकर, खुशु पचारे, कांचन राऊत व गिरीधर नेहारे आहे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन सार्जंट कोमल शितळे व पायल चौके यांनी तर आभार प्रहार समाज जागृती संस्थेचे सचिव संतोष तुरक यांनी मानले.




# गंगाखेडमध्ये लोकवर्गणीतून छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारला

**गंगाखेड । प्रतिनिधी**

संत जनाईंच्या पावन नगरी गंगाखेडच्या गौरवात भर घालणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा लोकवर्गणीतून उभारण्यात आला आहे. राजा शिवछत्रपती सेवाभावी संस्था आणि नगर परिषद, गंगाखेड यांच्या पुढाकाराने हा ऐतिहासिक महाशिल्प उभारण्यात आले असून बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य अनावरण सोहळा संपन्न होणार आहे.

या सोहळ्याच्या निमित्ताने श्री संत जनाई मंदिर ते शिवस्मारक अशी पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण भव्य आतषबाजी, लेझर शो आणि डी.जे. च्या साक्षीने होणार आहे.

या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सर्व शिवप्रेमींनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे



आवाहन नगर परिषद, गंगाखेड, राजा शिवछत्रपती सेवाभावी संस्था, शिवजयंती महोत्सव समिती (गोदातट) आणि शिवजयंती महोत्सव समिती (महाराणा प्रताप चौक) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री बागेश्वर धामच्या २५१ सामूहिक कन्या महोत्सवाच्या निमित्ताने वर्ध्यात भव्य सनातन भक्ती महोत्सव संपन्न

**वर्धा । प्रतिनिधी**

शहरातील कारला चौक येथील श्री हनुमान गड टेकडी मंदिर परिसरात श्री बागेश्वर धाम महाराष्ट्र सेवा समिती, वर्धा जिल्हा शाखेच्या वतीने १५ व १६ फेब्रुवारी रोजी सनातन भक्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या दोन दिवसीय धार्मिक उत्सवात प्रथम दिवशी 'श्री सीताराम हनुमान अखंड संगीतमय जप' आयोजित करण्यात आला, तर दुसऱ्या दिवशी सत्कार समारंभ, प्रवचन, महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. मागील वर्षीप्रमाणे यंदाही हजारो भक्तांनी या महोत्सवात सहभागी होत भक्तिमय वातावरण निर्माण केले.

१५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता सुरू झालेला 'श्री सीताराम हनुमान अखंड संगीतमय जप' १६ फेब्रुवारी सकाळी ११ वाजेपर्यंत अखंड चालू राहिला. त्यानंतर संध्याकाळी ५ वाजता महाआरती व





महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या उत्सवाचे आयोजन येत्या महाशिवरात्रीच्या निमित्ताने श्री बागेश्वर धाम येथे होणाऱ्या २५१ कन्यांच्या सामूहिक विवाह सोहळ्याच्या पूर्वसंध्येला करण्यात आले. २३ फेब्रुवारी रोजी छतरपूर येथील श्री बागेश्वर धाम मंदिर परिसरात कॅन्सर रुग्णालय आणि रिसर्च इन्स्टिट्यूटच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, ज्याचे शिलान्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. तसेच, २६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या सामूहिक विवाह सोहळ्याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

वर्धा येथील या सनातन भक्ती महोत्सवाचे मार्गदर्शन श्री बागेश्वर धाम महाराष्ट्र सेवा समितीचे प्रदेश संयोजक अभिजित करंजुळे पाटील यांनी केले. 'श्री सीताराम हनुमान अखंड संगीतमय जप' रवि खंडाळकर आणि त्यांच्या टीमने सादर केला. तसेच हनुमान गड मंदिराचे महंत त्यागीदासजी महाराज, स्वावलंबी भारतचे विदर्भ प्रमुख अटलबिहारी पांडेय, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वर्धा नगर विस्तारक नूपुर देशपांडे, ग्राम पंचायत पिपरी मेघेचे माजी सरपंच अजय गौलकर, वर्धा नागरिक बँकेचे संचालक व देवसभा मंदिर समितीचे कोषाध्यक्ष हरीश गांधी, सचिव सुनील दीक्षित आणि समितीचे वर्धा-सेलू संयोजक सागर पोकळे यांची विशेष उपस्थिती होती.श्री बागेश्वर धाम महाराष्ट्र सेवा समितीच्या वर्धा जिल्हा शाखेच्या कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अथक मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी समितीचे जिल्हा महामंत्री नितीन शेंडे यांनी सर्व श्रद्धाळू भक्तांचे आभार मानले.

# जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय फुलसावंगी येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**उमरखेड । प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय फुलसावंगी येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक हातमोडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.समारंभात विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत शिक्षकांनी यशस्वी भविष्यासाठी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक हातमोडे म्हणाले, शिस्त, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम हाच यशाचा मूलमंत्र आहे. विद्यार्थ्यांनी मेहनतीच्या जोरावर शाळेचे नाव उज्ज्वल करावे.

यावेळी खोकले , राऊत आणि राठोड यांनी जीवनातील संघर्षांना धैर्याने सामोरे जाण्याचा



संदेश दिला. शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. समारंभात हसतमुख वातावरणात आनंदी क्षण अनुभवता आले. यावेळी शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार देत पेन वाटप करण्यात आले.कार्यक्रमास अंधारे , पडलवार , मुलगीर , साळवे, सोनटक्के , राठोड , काटोले , माने , वानखेडे , चव्हाण , व्हडगीरे , कोरेवाड , लकडे , खान आणि रुद्राक्ष कॅम्प्युटरचे संचालक योगेश राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

# विदर्भ पटवारी संघाच्या वर्धा अध्यक्षपदी संजय भोयर यांची बिनविरोध निवड

**वर्धा । प्रतिनिधी**

विदर्भ पटवारी संघ उपविभाग शाखा वर्ध्याची वार्षिक सभा १६ फेब्रुवारी २०२४ रोजी गुरुवारी जिल्हा महसूल लॉन, वर्धा येथे पार पडली. या सभेत संघाच्या स्थापनेपासून पहिल्यांदाच अध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध पार पडली.

सभेत संजय भोयर यांची वर्धा अध्यक्षपदी, अमोल रामटेके यांची सचिवपदी, तर नारायण भाऊराव साखरकर यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच सहसचिवपदी श्यामराव लटके, सतीश बबडे, सुरेश भट, तिलक चंद्रखडे, सुलोचना पळसकर, बालासाहेब ठोंबरे, आनंद आगलावे, किरण कुंभारे,



पंडित नवडे, अंकुश चटाई, लोहकरे, महेश राऊत, निलेश खामखेडे, समाधान भालेराव, मिलिंद चौबे, सुदर्शन बनसोड, गोविंद भोसले यांची निवड करण्यात आली.सभेत मार्गदर्शक म्हणून विदर्भ पटवारी संघाचे जिल्हाध्यक्ष अजय गंगे, जिल्हा सचिव प्रदीप इंगळे, जिल्हा उपाध्यक्ष सागर इंगळे, तसेच माजी अध्यक्ष रोंद्रेश देशमुख, पत्रकार संरक्षण समितीचे तालुका अध्यक्ष संजीव वाघ व इतर मान्यवर उपस्थित होते.निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सलोड ग्रामपंचायत सरपंच कन्नाके व उपसरपंच आशिष कुचेवार तसेच संपूर्ण ग्रामस्थांच्यावतीने हार्दिक अभिनंदन करून त्यांना यशस्वी कार्यकाळाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमाचे संचालन श्रीराम गभणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नवनीयुक्त सचिव अमोल रामटेके यांनी मानले.

### 'ऑन द स्पॉट' मान्यतेचा धडाका कायम

# आमदार सुधाकर अडबाले यांच्या समस्या निवारण सभेत ४ प्रकरणांना मान्यता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**


आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या उपक्रमाअंतर्गत आज शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. चंद्रपूर यांच्याकडे जिल्ह्यातील खासगी अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेत कार्यरत शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारणार्थ समस्या निवारण सभा आज मा. सा. कन्नमवार सभागृह, चंद्रपूर येथे पार पडली. यावेळी ३ अनुकंपा व १ उपमुख्याध्यापक पदोन्नती प्रकरणांना 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले. मागील दोन्ही सभेत प्रलंबित प्रकरणे रात्री ९ वाजेपर्यंत 'ऑन द स्पॉट' निकाली काढण्यात आली होती. यामुळे आमदार सुधाकर अडबाले यांचा समस्या निवारण सभेत 'ऑन द स्पॉट' प्रकरणे निकाली काढण्याचा धडाका कायम असल्याने शिक्षकांत आनंदाचे वातावरण आहे.

मागील दोन वर्षांत चंद्रपूर जिल्ह्यात शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची अनेक प्रकरणे प्रलंबित



होती. आमदार सुधाकर अडबाले निवडून आल्यापासून समस्या निवारण सभेच्या माध्यमातून त्या निकाली काढण्याचा धडाका लावला. आज पार पडलेल्या विषयसूचीतील १०० प्रकरणांपैकी जवळपास ८० टक्के प्रकरणे समस्या सभा होण्यापूर्वीच निकाली काढण्यात आली.सभेत अनुकंपा तत्वाअंतर्गत कार्तीक दुधपचारे यांना जनता कन्या विद्यालय नागभीड येथे शिपाई सेवक, नित्यानंद मोतेवाड यांना कै. अण्णाभाऊ साठे माध्य. व उच्च माध्य. विद्यालय कुंभेझरी येथे प्रयोगशाळा परिचर सेवक, वैष्णवी बंडू भगत हिला आदर्श किसान विद्यालय तथा क. महा. नारंडा येथे कनिष्ठ लिपीक सेवक तर नंदा मुप्पीडवार (भवानजीभाई चव्हाण हाय. व क. महा. चंद्रपूर) यांना उपमुख्याध्यापकपदी पदोन्नती पदास 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले. सदर सभा पाच तास चालली.यावेळी मागील सभेतील इतिवृत्तावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर सामूहिक व वैयक्तिक प्रकरणांवर चर्चा करण्यात आली. सभेच्या विषयसूचीतील बरीच प्रकरणे निकाली काढण्यात आली. व उर्वरित प्रकरणे १० दिवसांत निकाली काढण्यात यावी, अशा सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी अधिकाऱ्यांना दिल्यात.सभेला शिक्षणाधिकारी (माध्य.) राजेश पातळे, उपशिक्षणाधिकारी निकीता ठाकरे, वेतन पथक अधीक्षक श्री. वडेट्टीवार, जगदीश जुनघरी, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी, जिल्हा कार्यवाह दीपक धोपटे, महानगर कार्यवाह सुरेंद्र अडबाले, लक्ष्मणराव धोबे, केशवराव ठाकरे, श्रीहरी शेंडे, मारोतराव अतकरे, आनंद चलाख, हेमंतकुमार किंदरले, डॉ. विजय हेलवटे, नितीन जीवतोडे, रुपेश पुरी, प्रज्ञा बारेकर, आसमा खान, अजय विधाते, नंदकिशोर वर्धेलवार, नामदेव ठेंगणे, पाचभाई सर, नाकाडे सर, श्री. निखाडे, अनिल कंठीवार, सतीश मेश्राम व मोठ्या संख्येने जिल्ह्यातील विमाशि संघाचे सदस्य, समस्याग्रस्त शिक्षक उपस्थित होते.

# आरोग्यमित्रांच्या राज्यव्यापी संपाला सुरुवात; मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन कायम



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आरोग्यमित्र कर्मचारी संघटनेच्या वतीने आजपासून (१८ फेब्रुवारी २०२५) राज्यव्यापी बेमुदत धरणे आंदोलन सुरू झाले आहे. महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत कार्यरत आरोग्यमित्रांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संप पुकारला आहे.

संघटनेने राज्य आरोग्य हमी सोसायटी (डक-ड) आणि सहाय्य संस्था (ढझ-) यांना वारंवार पत्रव्यवहार करून निर्णय घेण्याची मागणी केली, मात्र मागण्या मान्य झाल्या नाहीत. २३ ऑगस्ट २०२४ रोजी जीवनदायी भवन, मुंबई येथे झालेल्या बैठकीतही सीईओंनी आश्वासन दिले होते, मात्र ठोस निर्णय झाला नाही. त्यानंतर ७ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या बैठकीत १० दिवसांचा अवधी मागण्यात आला, परंतु १७ फेब्रुवारीपर्यंतही निर्णय न झाल्याने १८ फेब्रुवारी पासून बेमुदत संप सुरू करण्यात आला आहे.

चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोरही आरोग्यमित्रांनी आंदोलन केले. उखढण चंद्रपूर जिल्हा संघटनेचे सदस्य कॉ. किशोर जामदार, कॉ. राजेश पिंजरकर, कॉ. अरुण भेलके यांनी आंदोलनाला मार्गदर्शन केले. यावेळी संघटनेकडून जिल्हाधिकारी विनय गौडा यांना निवेदन देण्यात आले.संघटनेचे अध्यक्ष कॉ. डॉ. डी. एल. कराड यांनी, मागण्या पूर्ण होईपर्यंत संप मागे घेणार नाही, असे स्पष्ट केले.

# डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या भौतिकोपचार महाविद्यालयास 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय २०२५' राष्ट्रीय पुरस्कार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपी (ख-झ) तर्फे नाशिक येथे १५ व १६ फेब्रुवारी २०२५ रोजी ६२ वी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या भौतिकोपचार महाविद्यालयाला 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय २०२५' हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच, 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य' म्हणून प्राचार्य डॉ. श्याम गणवीर यांना सन्मानित करण्यात आले.



हा पुरस्कार आयएपीचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. अली इराणी, राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. संजीव झा, खजिनदार डॉ. रुची वार्ष्णेय, आमदार सत्यजीत तांबे तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. संस्थेचे संचालक (वैद्यकीय) प्रा. डॉ. अभिजीत दिवटे आणि प्राचार्य डॉ. श्याम गणवीर यांनी हा सन्मान स्वीकारला. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे भौतिकोपचार महाविद्यालय २००७ पासून कार्यरत असून राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद (NAAC) द्वारे '-' ग्रेड मानांकन प्राप्त आहे. तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली हे महाविद्यालय प्रतिभावान, कार्यक्षम आणि अष्टपैलू भौतिकोपचार तज्ज्ञ घडविण्याचे कार्य अविरतपणे करत आहे. सध्या या महाविद्यालयात ६० विद्यार्थी पदवी (UG), ०५ विषयांत पदव्युत्तर (PG), तसेच २४ विद्यार्थी विद्यावाचस्पती (Ph.D.) अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत. देशात भौतिकोपचार तज्ज्ञांची संख्या तुलनेने कमी असल्याने त्यांची संख्यावाढ आवश्यक आहे. विविध व्याधींमुळे हालचालीस अडथळा येणाऱ्या रुग्णांसाठी तसेच खेळाडूंसाठी फिजिओथेरपीचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत आहे, असे या परिषदेत नमूद करण्यात आले.
इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपी ही संस्था १९५५ साली स्थापन झाली असून भारतात भौतिकोपचार तज्ज्ञ घडवण्यासाठी आणि समाजाचे आरोग्य सशक्त करण्यासाठी तिचे योगदान महत्त्वपूर्ण आहे या पुरस्कारप्राप्तीनंतर संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त शालिनी ताई विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी सुजय विखे पाटील तसेच महासंचालक (प्रशासन) डॉ. पी. एम. गायकवाड यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# गिरोली (इंगळे) येथे समाजकार्याचे श्रम संस्कार शिबिर

**देवळी । प्रतिनिधी**

श्री. बी. के. समाजकार्य महाविद्यालयाच्या गिरोली गावात सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर केवळ शारीरिक श्रमाचे नव्हे, तर सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण, सहकार्य, आणि आत्मशिस्तीचे महत्त्व शिकवणारे होते.
श्रम हीच साधना, समाजसेवेसाठी चला पुढे अशा घोषणांनी गावभर उत्साह निर्माण केला गेला. उद्घाटन सोहळ्यात महाविद्यालयाच्या (प्राचार्य माधवी धुर्वे, प्रा.आशिष ढगे सर, प्रा. घिये सर प्रा. दिगांबर मॅडम व पोलीस पाटील गिरोली स्मिता थुल उपस्थित होत्या) त्यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने अशा अनेक कार्यांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला. श्रमदानातून श्रमाचा खरा अर्थ उमजला आणि परिश्रमाचे महत्त्व पटले. रात्रीच्या वेळेस विविध नाटक, लोकगीते, एकपात्री




प्रयोग, नृत्ये असे कार्यक्रम झाले. यामुळे विद्यार्थ्यांनच्या कलागुणांना वाव मिळाला आणि मनोरंजनाबरोबरच सामाजिक संदेश देण्याची संधी मिळाली. शिबिरातील प्रत्येक दिवस वेगळा अनुभव देणारा होता. सकाळी उठण्यापासून रात्री झोपेपर्यंतचा प्रत्येक क्षण टीमवर्क, जबाबदारी, आणि नेतृत्वगुण विकसित करणारा ठरला. हे शिबिर केवळ सात दिवसांचे असले तरी, त्या अनुभवांनी संपूर्ण आयुष्य समृद्ध झाले असे म्हणले तरी वावगे ठरणार नाही. शिबिर प्रमुख प्रा.आशिष सु. ढगे यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांना खूप काही शिकायला मिळालं. शिबिरात अनुभवलेली एकता, श्रमाची गोडी, सहकार्याची भावना आणि एकत्र येऊन काहीतरी चांगले घडवण्याचा उत्साह हे सर्व खूप मोलाचे होते. या शिबिराला ाि भाग १ चे व ाि भाग २ चे विद्यार्थी उपस्थित होते.

# ठाणे व पालघर जिल्हा शिक्षक पतपेढीचा स्तुत्य उपक्रम: सभासद हिताचे निर्णय जाहीर

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे व पालघर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांसाठी अग्रगण्य असलेल्या महाराष्ट्रातील नामांकित पतसंस्थेच्या संचालक मंडळाने सभासदांच्या हितासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी २०२५ रोजी या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची घोषणा संस्थेचे अध्यक्ष प्रकाश मरले यांनी केली.
नवीन निर्णयानुसार, संस्थेतील सभासदांकडून जामीनकी तारण कर्ज मंजुरीसाठी अंधेसिव्ह स्टॅम्प करारपत्र घेण्यात येणार नाही. याऐवजी, सभासदांना कर्ज अर्जासोबत २५% कर्जफेडीसाठी आवश्यक धनादेश देऊन कर्ज मंजूर केले




जाईल. कर्ज मंजुरी नंतर रक्कम तत्काळ सभासदांच्या बँक खात्यात वर्ग केली जाईल, ज्यामुळे सभासदांना जलद सेवा मिळणार आहे.तसेच, जिल्हा परिषद व महानगरपालिकेतील एक वर्ष सेवा पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकांना सभासदत्व देण्यात येईल, आणि मुदत ठेवीदार सभासदांना मुदत ठेव कर्ज मंजूर केले जाईल.संस्थेचे अध्यक्ष प्रकाश मरले म्हणाले, ठाणे व पालघर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था आहे जी सभासदांना आणि मयत सभासदांच्या वारसांना सर्वाधिक लाभ देणाऱ्या योजना देते, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.या प्रसंगी संस्थेचे माजी अध्यक्ष भरत मडके, संचालक अनिल सांगळे, उमेश जाबर, अधीक्षक अरुण पानसरे, उप लेखापाल अनील साबळे, वरिष्ठ लिपिक सुहासिनी नाखरेकर तसेच सर्व शाखा अधिकारी उपस्थित होते.

# पर्यटन आणि प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना प्रस्तावित करा

## वार्षिक योजनेच्या आढाव्यात जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा विकास, प्रक्रिया उद्योगांना चालना आणि रोजगारनिर्मिती यासंदर्भात नाविन्यपूर्ण कामे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी आज दिले. विशेषतः क वर्ग पर्यटन स्थळांमध्ये टिपागड, झाडापापडा, सिरोंचा त्रिवेणी संगम, कमलापूर हत्ती कॅम्प, लेखामेंढा, चपराळा अभयारण्य, अरततोंडी महादेव, कोठारी बौद्ध स्तूप, तुमडी, आष्टी येथील निसर्गरम्य परिसर आणि मुतनूर या अकरा ठिकाणी पायाभूत सुविधा उभारण्यास प्राधान्य देऊन पर्यटकांना



अधिक आकर्षित करण्याचे व त्या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.
जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ चा आढावा जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या अध्यक्षतेखाली आज घेण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, सहायक जिल्हाधिकारी राहुल मीना, अपर पोलीस अधीक्षक एम. रमेश, जिल्हा नियोजन अधिकारी श्रीराम पाचखेडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी यांनी स्थानिक नागरिकांच्या उपजीविकेस चालना देणारे प्रकल्प प्राधान्याने हाती घेण्याचे सांगून रेशीम शेती, मध उत्पादन, डेअरी उत्पादन आणि हिरडा, बेहडा, चारोळीसारख्या वनउपजांवर प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी नाविन्यपूर्ण योजनांअंतर्गत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, जिल्हा वार्षिक योजनेतील निधी वेळेत खर्च करण्याचे सांगितले.बैठकीला विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# आदिवासी मुक्ती मोर्चाच्या शहापूर व जव्हार तालुका अध्यक्षपदी नवीन नियुक्त्या



**जव्हार । प्रतिनिधी**

आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेच्या शहापूर तालुका अध्यक्षपदी संतोष तरे तर जव्हार तालुका अध्यक्षपदी तुळशीराम गोविंद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
संतोष तरे हे संघटनेच्या स्थापनेपासून सक्रिय सदस्य असून, त्यांनी विविध आंदोलने, उपोषणे आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांचा तालुक्यातील लोकांशी उत्तम संपर्क असल्याने संघटनेच्या विस्तारास हातभार लागणार आहे.
संघटनेचे अध्यक्ष अनंता वनगा यांनी नियुक्तीपत्र प्रदान करताना स्पष्ट केले की, आदिवासी मुक्ती मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसून, गोर-गरीब आणि पीडित जनतेच्या न्यायासाठी लढणारी संघटना आहे.संघटनेच्या कार्यकर्त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवून पीडितांना न्याय मिळवून देण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. यावेळी संघटनेचे संस्थापक सदस्य संतोष जाधव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# श्रीरामपूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या आश्वारूढ पुतळा उभारणीस मंजुरी

## ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे अडथळे दूर

**लोणी । प्रतिनिधी**

शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य आश्वारूढ पुतळा उभारणीसाठी आवश्यक परवानग्या मिळाल्या असून, जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे या स्मारकाच्या उभारणीतील अडथळे दूर झाले आहेत.
शिवप्रेमी आणि हिंदुत्ववादी संघटनांनी अनेक वर्षांपासून या स्मारकाच्या उभारणीची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर भाजपा जिल्हा अध्यक्ष नितिन दिनकर आणि तालुका अध्यक्ष दीपक पटारे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा करण्यात आला.
ना. विखे पाटील यांनी तातडीने या मागणीची दखल घेत निधी उपलब्ध करून देण्यासोबतच जागेची निश्चिती केली. स्मारकाच्या



उभारणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य वास्तुशास्त्र विभागाने तसेच शासनाच्या कला संचालनालयाने आवश्यक मंजुरी दिली आहे.
मुख्य वास्तुशास्त्रज्ञ चेतन आक्रे यांनी स्मारकाच्या आराखड्यास मान्यता दिल्याचे पत्र नगरपालिका प्रशासनाला पाठवले आहे. तसेच, शासनाच्या कला संचालनालयाने आश्वारूढ पुतळ्यास मान्यता देत फायबरच्या मॉडेलमध्ये सुधारणा करून ते ब्राँझ धातूमध्ये साकारण्यास मंजुरी दिली आहे.
या निर्णयामुळे शहरातील शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. स्मारकाच्या कामाला लवकरच सुरुवात होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या योगदानाबद्दल महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करत आभार मानले आहेत.

# उंडवडी सुपे उपसरपंचपदी अश्विनी राजेंद्र मांढरे यांची बिनविरोध निवड

**बारामती । प्रतिनिधी**

उंडवडी सुपे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदासाठी दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी निवडणूक प्रक्रिया ग्रामसेवक विनोद आटोळे यांच्या अध्यक्षतेखाली राबवण्यात आली. सरपंच शोभा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. उपसरपंच अनिल गवळी यांनी दुसऱ्यांना संधी देण्यासाठी उपसरपंचपदाचा राजीनामा दिला, त्यानंतर उपसरपंच पदासाठी एकच अर्ज आलेला होता, जो अश्विनी राजेंद्र मांढरे यांचा होता.
नियोजित वेळेनुसार निवडणूक निर्णय अधिकारी, ग्रामसेवक विनोद आटोळे यांनी अश्विनी राजेंद्र मांढरे यांची बिनविरोध निवड जाहीर केली. या कार्यक्रमाला उपसरपंच अनिल गवळी,



ग्रामपंचायत सदस्या रोहिणी गवळी, राणी गवळी, लता जगताप, गोरख गवळी, माजी सरपंच विनायक गवळी, उंडवडी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन बापुराव गवळी, बाभुळसर बु येथील मनोहर मचाले चेअरमन संत तुकाराम विण.का. सोसायटीचे संचालक अमोल नागवडे, उपाध्यक्ष पद्मश्री आप्पासाहेब पवार माध्यमिक विद्यालय बाभुळसर बु, तसेच युवा कार्यकर्ते निलेश नागवडे, नवनाथ मांढरे, संजय मांढरे, अनिल गवळी, संतोष गवळी, संतोष जगताप, मोहन गवळी, आप्पासो मांढरे, राजेंद्र मांढरे, अनिल भगत, ननु भगत, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.अश्विनी राजेंद्र मांढरे यांनी या निवडीबद्दल आपल्या मनोगतात सांगितले की, मी उंडवडी गावाच्या विकासासाठी व गावपातळीवरील सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी आपले कर्तव्य पार पाडणार आहे. कार्यक्रमाचे आभार माजी सरपंच विनायक गवळी यांनी मानले.

# एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना महिला आघाडीचा उपक्रम

**कोल्हार । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना महिला आघाडीने एक समाजकल्याणकारी उपक्रम राबवला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चंदनापुरी, तालुका संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर येथे विद्यार्थ्यांना गणपती अथर्वशीर्ष, गणपती स्तोत्र आणि आई-वडिलांचे महत्त्व यावर मार्गदर्शन



करण्यात आले. २०२५ मध्ये संपूर्ण वर्षभर अशा अनेक लोककल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्याचा निर्धार शिवसेना महिला आघाडीच्या उत्तर नगर जिल्हा प्रमुख, सुनीता शेळके यांनी व्यक्त केला. या उपक्रमात शिवसेना महिला आघाडीच्या प्रमुख मान्यवर, शाळेतील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळोधी (बाळापूर) येथे १९ व २० फेब्रुवारीला श्री संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवाचे आयोजन

**तळोधी (बाळापूर) । प्रतिनिधी**

तळोधी येथील टिचर कॉलनीमध्ये १९ व २० फेब्रुवारी रोजी श्री संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवाचा आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता आरती होईल, त्यानंतर गुरुदेव सेवा मंडळातर्फे महिलांचे भजन रात्री ८ ते १० वाजता होणार आहे.
२० फेब्रुवारीला सकाळी ६ वाजता श्री संत गजानन महाराजांचा अभिषेक व आरती होईल. त्यानंतर दुपारी ३ ते ६ वाजता गुरुदेव भजन मंडळाच्या कळ्याचे भजन होईल. सायंकाळी ६ वाजता महाआरती होऊन महाप्रसाद वितरण सुरू होईल. प्रगट दिनानिमित्त होणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाचा भाग व्हावा, असे आयोजन समिती व श्री संत गजानन महाराज व्ही.सी. ग्रुपतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

